मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी महापालिकेचा 'ग्रीन सोसायटी' उपक्रम

**पर्यावरणपूरक उपाययोजना करणाऱ्या गृहप्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी उपक्रम : कचरा व्यवस्थापन, सौरऊर्जा, पावसाचे पाणी संकलन अशा विविध निकषांवर सोसायट्यांचे मूल्यमापन**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पर्यावरणपूरक उपाययोजना करणाऱ्या गृहप्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने 'ग्रीन सोसायटी' हा उपक्रम सुरू केला आहे. स्थानिक पातळीवर उपाययोजना राबवून नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल जनजागृती वाढविणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.




पर्यावरणपूरक उपाययोजना करणाऱ्या गृह प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेने 'ग्रीन सोसायटी' हा उपक्रम सुरू केला आहे. स्थानिक पातळीवर उपाययोजना राबवून नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल जनजागृती वाढविणे हा या उपक्रमाचा उद्देश असून, हे पाऊल पर्यावरणस्नेही परिसर आणि जबाबदार नागरी जीवनशैली निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

या उपक्रमांतर्गत ओला-सुका कचऱ्याचे वर्गीकरण करणे, सोसायटीमध्ये सेंद्रिय कचऱ्याचे कंपोस्टिंग करणे, सौरऊर्जेचा वापर करणे, पावसाचे पाणी साठवणे (रेन वॉटर हॉर्वेस्टिंग), आणि सांडपाण्याचे शुद्धीकरण व पुनर्वापर यंत्रणा बसविणे याचा समावेश होतो. प्रत्येक निकष पूर्ण केल्यावर सोसायटीला एक हरित तारांकित मानांकन (स्टार रेटिंग) दिले जाणार आहे. सर्व निकष पूर्ण करणाऱ्या सोसायट्यांचा महापालिकेच्या वतीने सन्मान करण्यात येणार आहे. महापालिका शहरातील वातावरण पर्यावरण पूरक ठेवण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या सोसायट्यांचा गौरव करणार आहे आणि यामुळे निश्चितच इतरांना प्रेरणा मिळणार आहे. तसेच महापालिकेकडून हा उपक्रम टप्प्याटप्प्याने राबवण्यात येणार आहे. सर्वप्रथम जनजागृती सत्रे घेतली जातील, त्यानंतर नोंदणी प्रक्रिया, प्रशिक्षण सत्रे आणि प्रत्यक्ष सोसायटींचे मूल्यांकन करण्यात येईल.

### शाश्वत शहर जीवनशैलीकडे वाटचाल

» आरोग्य विभागाचे उपायुक्त सचिन पवार म्हणाले, 'ग्रीन सोसायटी या उपक्रमामुळे फक्त इच्छाशक्ती नव्हे, तर कृती घडवून आणणारी दिशा गृहप्रकल्पांना मिळणार आहे. पिंपरी-चिंचवडकरांना शाश्वत शहर जीवनशैलीकडे वाटचाल करण्यासाठीदेखील यामुळे प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास आहे. 'ग्रीन सोसायटी' उपक्रम ही केवळ शासकीय योजना नसून, लोकांच्या सहभागातून पर्यावरण जागरूकतेची संस्कृती निर्माण करण्याची चळवळ ठरणार आहे.'

### कशी असायला हवी एक 'ग्रीन सोसायटी'?

» कचरा वर्गीकरण: ओला आणि सुका कचरा स्रोताजवळच वेगळा करणे.
» घरगुती कंपोस्टिंग: सेंद्रिय कचऱ्याचे सोसायटीमध्येच व्यवस्थापन करणे.
» सौरऊर्जा वापर: सार्वजनिक भागांतील वीज गरजांसाठी सौर पॅनेलचा वापर करणे.- पावसाचे पाणी साठवण (रेनवॉटर हार्वेस्टिंग): पावसाचे पाणी संकलित करून वापरणे.
» सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापर: सांडपाण्यावर प्रक्रिया करून बागकाम व अन्य उपयोगांसाठी वापरणे.

# सुधारित विकास आराखडा: मोशीत कत्तलखाना नव्हे, गोशाळा होणार

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन विकास आराखड्यामध्ये मोशी येथे कत्तलखाना प्रस्तावित केला होता.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन विकास आराखड्यामध्ये मोशी येथे कत्तलखाना प्रस्तावित केला होता. या आरक्षणास स्थानिक नागरिक, भूमिपुत्र आणि सकल हिंदू समाजाचा तीव्र विरोध आहे. त्यामुळे सदर आरक्षण बदल करुन, त्याच ठिकाणी गोशाळा उभारण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी आग्रही भूमिका घेतली आहे.



पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने नवीन प्रारुप विकास आराखडा प्रसिद्ध केला आहे. त्यावर सर्वसामान्य नागरिक, भूमिपुत्र, लोकप्रतिनिधी यांच्या हरकती-सूचना मागवण्यात आल्या आहेत. प्रशासनाने मौजे मोशी येथील नवीन गट नं. ३२५ (जुना गट नं. ३२३) या गावच्या हद्दीत कत्तलखान्यासाठी जागा आरक्षीत केली आहे. याला स्थानिक नागरिक, हिंदूत्ववादी संघटना आणि भाजपा आमदार महेश लांडगे यांनी विरोध केला.

दरम्यान, मोशी ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने आज महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची भेट घेतली. मोशी हे ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीकोनातून महत्त्वाचे गाव असून, येथे अनेक धर्म, जाती आणि पंथाचे लोक शांततेने वास्तव्य करतात. अशा गावात कत्तलखाना सुरू केल्यास सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता आहे. हा हिंदू धर्मियांच्या भावना दुखावणारा निर्णय आहे.

तसेच, सार्वजनिक पर्यावरण, नागरी आरोग्य आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी प्रशासनाने सदर कत्तलखान्याचे आरक्षण रद्द करावे आणि त्या ठिकाणी गोशाळा सुरू करावी. कारण, याच परिसरात मोशीचे ग्रामदैवत आणि जागृत देवस्थान श्री. नागेश्वर महाराज यांचे समाधीस्थळ आहे. या ठिकाणी लाखो भाविकांच्या उपस्थितीमध्ये भंडारा उत्सव साजरा केला जातो. तसेच, श्रीक्षेत्र आळंदी आणि श्रीक्षेत्र देहू यांच्यामध्ये मोशी गाव असून, वारकरी सांप्रदाय या भागात मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे सदर आरक्षण रद्द करावे, अन्यथा मोशी ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला होता.

यावर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी ग्रामस्थांची भूमिका समजून घेतली. आमदार महेश लांडगे यांनी याबाबत मागणी केली आहे. त्यानुसार, सदर कत्तलखाना आरक्षण रद्द करण्यात येईल आणि त्या ठिकाणी गोशाळा आरक्षण निश्चित करण्याबाबत संबंधित कमिटीसमोर प्रस्ताव ठेवण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

# सर्व शासकीय कार्यालयत सौर ऊर्जेचा वापर सुरू करणार : मुख्यमंत्री

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाऊर्जाच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात डिसेंबर २०२५ पर्यंत सौर ऊर्जेचा वापर सुरू करणार असून प्रधानमंत्री सूर्य घर योजना राज्यात प्रभावीपणे राबविणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पुण्यातील महाऊर्जाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे ,खासदार मेधा कुलकर्णी, श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे ,भीमराव तापकीर, महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महाऊर्जाच्या महासंचालक डॉ.कादंबरी बलकवडे, महाराष्ट्र राज्य वीज कंपनीचे संचालक विश्वास पाठक, ऊर्जा दक्षता ब्युरोचे सचिव मिलिंद देवरे, अतिरिक्त महासंचालक डॉ. त्रिगुण कुलकर्णी आदी उपस्थित होते



### अशी आहे महाऊर्जा विकास अभिकरण इमारत....

» महाऊर्जाच्या औंध येथील नवीन इमारतीचे बांधकाम पर्यावरण पूरक (ग्रीन बिल्डिंग), सुपर इ.सी.बी.सी. व नेट झिरो एनर्जी संकल्पना धर्तीवर करण्यात आले आहे. यामध्ये पोरोथम ब्लॉक, डबल ग्लेज्ड विंडोज, सिरॅमिक जाळी, रेडियन्ट कुलिंग सिस्टिम, अर्थ टनेल ट्युब सिस्टिम, व्हेंच्युरी इफेक्ट, टू स्टेज इव्हॅपरेशन सिस्टिम, सोला ट्युब व २९० कि.वॅ. क्षमतेचे पारेषण सलंग्न सौर संयंत्र यांचा वापर करण्यात आला आहे.

हरित इमारतीसाठी असलेली सर्व मानके पूर्ण करणारी, निसर्गाचा पूर्णपणे उपयोग करणारी, ऊर्जेची बचत करणारी आणि आवश्यक असणारी ऊर्जा १०० टक्के निर्माण करणारी, महाऊर्जाची ही नवी इमारत म्हणजे हरित इमारतीचा उत्तम नमुना आहे. ऊर्जा बचतीच्या क्षेत्रात आणि अपारंपरिक ऊर्जेच्या क्षेत्रात, महाराष्ट्राने चांगली कामगिरी केली आहे.

गेल्या २ वर्षात देशभरात ४ लाख कृषी पंप बसाविण्यात आले असतांना राज्याने अपारंपरिक ऊर्जेच्या वापरला प्रोत्साहन देत ५ लाख सौर कृषीपंप बसविले. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीच्या माध्यमातून १६ हजार मेगा वॉट क्षमतेचे फिडर २०२६ पर्यंत सौर ऊर्जेवर परिवर्तीत करण्यात येणार आहेत. त्याचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. विभाजीत पद्धतीने असलेला, आशियातील हा सर्वात मोठा प्रकल्प आहे. एकूणच सौर, पवन आणि हायड्रोजन क्षेत्रातही राज्याने भरारी घेतली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

फडणवीस यांनी सांगितले की,महाऊर्जाने गेल्या काही वर्षात अपारंपरिक ऊर्जा निर्माण करण्यात चांगली कामगिरी केली आहे. सौर ऊर्जेच्या निर्मितीत देशात आपण अग्रेसर आहोत. विभाजीत पद्धतीने सौर ऊर्जेवर वीज निर्माण करूनही देशात आपण महत्वाचे स्थान मिळविले आहे. कुसुम योजनेच्या अंमल बजावणीतही आपण पुढे आहोत. २०२६ च्या डिसेंबरपर्यंत कृषीची संपूर्ण वीजेची मागणी सौर ऊर्जेवर परिवर्तित करू शकू. गेल्या २० वर्षात दरवर्षी वीजेचे दर ९ टक्क्याने वाढवत आहेत. २०२५ ते २०३० मध्ये दरवर्षी वीजेचे दर आपण कमी करणार आहोत.

### 300 युनिटचा वापर करणाऱ्याचे बिल शून्यावर आणणार..

» मुख्यमंत्री म्हणाले, महाऊर्जासाठी येत्या काळात दोन उद्दीष्टे महत्वाची आहेत. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जेचा वापर करण्याला गती द्यावी लागेल. प्रधानमंत्री सुर्यघर योजना यशस्वी योजना असून त्या योजनेशी संलग्न असलेली राज्याची योजना सुरू करून पहिल्या टप्प्यात १०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक आणि दुसऱ्या टप्प्यात ३०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक सौर ऊर्जेवर आणायचे आहेत. ३०० युनिटपर्यंत वीजेचा वापर करणाऱ्या ग्राहकांचे वीजचे देयक शून्यावर यावे असा प्रयत्न आहे. ही दोन्ही उद्दीष्टे पूर्ण करण्यासंदर्भात महाऊर्जा हे काम चांगल्यारितीने करेल.

### 2030 पर्यंत 52 टक्के वीज अपारंपरिक स्रोताद्वारे..

» सौर ऊर्जा निर्मितीसाठी येणाऱ्या समस्या दूर करण्याला प्राधान्य देत असल्याने वेगाने काम होत आहे. नुकताच रशियाच्या शासकीय कंपनीसोबत थोरियमपासून ऊर्जा निर्मितीत करार करण्यात आला असून हा करार भारतासाठी ऊर्जा क्षेत्राचे चित्र बदलणारा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या कामांमुळे पर्यावरणाचा विनाश थांबविता येईल आणि २०३० पर्यंत ५० टक्के वीज अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातून निर्माण करण्याचे स्वप्नही पूर्ण होईल. २०३० पर्यंत राज्यात ५२ टक्के वीज अपारंपरिक स्रोतातून निर्माण होईल, असेही फडणवीस यांनी सांगितले."

# पुणे-मुंबई एक्स्प्रेस-वे आता १० लेनचा सुपर हायवे

## एमएसआरडीसीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प, भविष्यात वाहनांच्या संख्येत होणारी वाढ लक्षात घेऊन या प्रकल्पाचे नियोजन

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) पुणे-मुंबई एक्स्प्रेसवेचा कायापालट करून त्याचे १० लेन सुपरहायवेमध्ये विस्तार करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्याच्या तयारीत आहे. वाढत्या वाहतूक कोंडीला तोंड देण्यासाठी आणि भविष्यात वाहनांच्या संख्येत होणारी वाढ लक्षात घेऊन या प्रकल्पाचे नियोजन केले जात आहे.



सुरुवातीला आठ लेनमध्ये त्याचा विस्तार करण्याची योजना आखण्यात आली असून, या प्रकल्पासाठी अंदाजे १ हजार ४२० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. सध्या प्रकल्पाचा सविस्तर अहवाल (डीआरपी) अंतिम टप्प्यात असून लवकरच तो शासनाच्या मंजुरीसाठी सादर केला जाणार आहे, असे एमएसआरडीसीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी सांगितले.

२००२ मध्ये सुरू झालेल्या ९४.६ किलोमीटर लांब एक्स्प्रेसवेवर सध्या आठवड्याभरात ६५ हजारांपेक्षा अधिक वाहने ये-जा करतात. आठवडा संपताना ही संख्या १ लाखाच्या आसपास पोहोचते. दरवर्षी ५-६ टक्क्यांनी वाहतूक वाढत असल्यामुळे, हा विस्तार आता आवश्यक बनला आहे. लेन वाढवल्यामुळे वाहतुकीची कोंडी कमी होईल आणि प्रवास अधिक सुरळीत होईल,असे एमएसआरडीसीने म्हटले आहे.

या प्रकल्पाचा एकूण अंदाजे खर्च, बांधकाम आणि सहाय्यक खर्चासह, १४ हजार २६० कोटी रुपये आहे. राज्य सरकारकडून निधी घेण्याऐवजी, टोल महसुलातून वित्तपुरवठा करण्याचा मानस आहे.

### घाटमार्गात तब्बल 10 लेनसाठीचा विस्तार

» सध्या पुणे-मुंबई प्रवासासाठी सुमारे दोन तास लागतात, पण सप्ताहांत आणि सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये हा कालावधी वाहतूक कोंडीमुळे आणि वाहनांच्या गर्दीमुळे आणखी एक तास वाढतो. एक्स्प्रेसवेचा विस्तार केल्यामुळे प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल, असा विश्वास एमएसआरडीसीला आहे. हा प्रकल्प भारतातील सर्वात महत्त्वाकांक्षी महामार्ग विकास उपक्रमांपैकी एक मानला जात आहे. त्यात खंडाळा घाटातील १३ किलोमीटर लांब असा १० लेनसाठीचा विस्तारही समाविष्ट आहे. नव्या प्रस्तावानुसार उरलेल्या ६७ किलोमीटर रस्त्याचा विस्तारही करण्यात येणार आहे.

# पहिल्याच पावसात शहर खड्डेमय; केवळ 508 खड्डे असल्याचा महापालिकेचा दावा

## पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वच रस्त्यांवर खड्डे पडले आहेत त्यात पाणी साचून चिखल व खड्डी निर्माण होत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पहिल्याच पावसात पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वच रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. त्यात पाणी साचून चिखल व खड्डी निर्माण होत आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीचा सामना वाहनचालकांना करावा लागला. मे महिन्यात झालेल्या पावसामुळे विविध भागात तब्बल 508 खड्डे पडले. पावसाळ्यापूर्वी 855 असे एकूण 1 हजार 356 खड्डे शहरात आढळले. त्यापैकी 848 खड्डे बुजविले असून, 508 खड्डे बुजविण्याचे काम सुरू असल्याचा दावा महापालिकेने केला आहे.

या संदर्भात पुढारीने छायाचित्रासह वृत्त प्रसिद्ध केले होते. त्याची दखल घेत महापालिका प्रशासनाने तातडीने कार्यवाही सुरू केली आहे. तसेच, खड्डे बुजविण्यासाठी नवीन अॅपची निर्मिती केली आहे.

पावसाळ्यातील चार महिने वगळता शहरातील विविध भागात पाणीपुरवठा, ड्रेनेज, विद्युत, गॅस वाहिनी, नेटवर्किंग, सीसीटीव्ही कॅमेरे, स्मार्ट सिटी, महामेट्रो, अर्बन स्ट्रीट डिझाईन अशा विविध प्रकल्पांसाठी रस्ते खोदाई केली जाते. रस्ते खोदाईसाठी 15 मे अखेरपर्यंत महापालिकेची मुदत होती.

मुदतीनंतर रस्ते खोदाई केल्यास दंड आणि गुन्हे दाखल करण्याचा महापालिकेने इशारा दिला होता. मात्र, अत्यावश्यक बाब म्हणून पावसाळ्यातही रस्ते खोदाई सुरूच आहे. त्यामुळे पहिल्याच पावसात शहरातील अनेक रस्त्यांवर खड्डे पडल्याचे दिसून येत आहे. त्यावरून रस्त्यांचा तसेच, रस्ते दुरुस्तीचा दर्जा किती सुमार आहे, हे स्पष्ट होत आहे.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालय हद्दीत 855 खड्डे आढळले. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली. सुमारे सात ते आठ दिवस अधून-मधून जोरदार पाऊस पडत होता. या पावसामुळे शहरभरात मुख्य आणि अंतर्गत रस्त्यांवर तब्बल 501 खड्डे पडल्याचे महापालिकेच्या पाहणीत समोर आले आहे.

पीसीएमसी पॉटहोल मॅनेजमेंट या अॅपमध्ये खड्ड्यांची नोंद होत आहे. एखाद्या रस्त्यावर पुन्हा खड्डा पडल्यास अॅपमध्ये दिसेल. त्यामुळे एका ठिकाणी दोनदा खड्डा पडल्यास संबंधित अधिकारी, ठेकेदारावर जबाबदारी निश्चित केली जाणार आहे. रस्त्याच्या किरकोळ कामाला एक वर्ष, डांबरी रस्त्याला तीन आणि सिमेंटच्या रस्त्याला पाच वर्षे दोष दायित्व निश्चित करण्यात आले आहे.

पावसाळ्याच्या सुरुवातीलाच नागरिकांना खड्ड्यातून वाट काढावी लागत आहे. खड्ड्यांच्या बाजूला खडीमुळे वाहने घसरून अपघाताच्या घटना घडत आहेत. पावसाळ्यापूर्वी आणि मागील आठवड्यात असे एकूण पडलेल्या 1 हजार 356 खड्ड्यांपैकी 848 खड्डे बुजविल्याचा दावा महापालिकेने केला आहे.




### संबंधित ठेकेदारांकडून खड्डे भरून घेणार

» पीसीएमसी पॉटहोल मॅनेजमेंट या अॅपमध्ये खड्ड्यांची नोंद होत आहे. एखाद्या रस्त्यावर पुन्हा खड्डा पडल्यास अॅपमध्ये दिसेल. त्यामुळे एका ठिकाणी दोनदा खड्डा पडल्यास संबंधित अधिकारी, ठेकेदारावर जबाबदारी निश्चित केली जाणार आहे. रस्त्याच्या किरकोळ कामाला एक वर्ष, डांबरी रस्त्याला तीन आणि सिमेंटच्या रस्त्याला पाच वर्षे दोष दायित्व निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे या रस्त्यावर खड्डे पडल्यास ते संबंधित ठेकेदारांकडून दुरुस्त करून घेण्यात येणार आहेत, असे महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी सांगितले.

### खड्डे बुजविल्याचा दावा

» पावसाळ्याच्या सुरुवातीलाच नागरिकांना खड्ड्यातून वाट काढावी लागत आहे. खड्ड्यांच्या बाजूला खडीमुळे वाहने घसरून अपघाताच्या घटना घडत आहेत. पावसाळ्यापूर्वी आणि मागील आठवड्यात असे एकूण पडलेल्या 1 हजार 356 खड्ड्यांपैकी 848 खड्डे बुजविल्याचा दावा महापालिकेने केला आहे.

### खड्डे बुजविण्याचे काम युध्दपातळीवर

» डांबर आणि कोल्ड मिक्सने 444, बीबीएमने म्हणजे खडीने 36, पेव्हिंग ब्लॉकने 288, सिमेंट कॉंक्रीटने 42 असे 848 खड्डे पूर्णपणे बुजविले आहेत. शहरात फक्त 508 खड्डे बुजवायचे बाकी असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. पाऊस कमी झाल्याने खड्डे बुजविण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# निगडीत गढूळ पाण्यामुळे नागरिक त्रस्त; नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## दाट लोकवस्तीच्या भागांमधील नागरिकांना कमी प्रमाणात पाणी मिळत असल्यामुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

निगडी-आकुर्डी प्राधिकरण प्रभाग क्रमांक 15 मध्ये पाणीपुरवठा विभागामार्फत काही भागात नियमित तर काही भागात दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे दाट लोकवस्तीच्या भागांमधील नागरिकांना कमी प्रमाणात पाणी मिळत असल्यामुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यातच प्रभाग क्रमांक 15 च्या निगडी-आकुर्डी प्राधिकरण भागात दूषित व गढूळ पाणी येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

सध्या शहरामध्ये अनेक ठिकाणी विकासकामांनी जोर धरला असून, सर्वच ठिकाणी मोठ्या प्रमाणात खोदकाम केले जात आहे. यातच योग्य ती खबरदारी न घेतल्याने काही ठिकाणी जलवाहिनी फुटून अनेक वेळा लाखो लिटर पिण्याचे पाणी वाया जाते.

निगडी व आकुर्डी प्राधिकरण प्रभाग क्रमांक 15 मध्ये याचप्रमाणे अनेक दिवसांपासून गढूळ व दूषित पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. याबाबत माजी उपमहापौर शैलेजा मोरे यांनी पिंपरी चिंचवड महापालिका पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांना निवेदन देऊन लवकरात लवकर ही समस्या दूर करण्याची मागणी केली आहे.



### जलवाहिनी फुटण्याचे प्रमाण वाढले

» सध्या शहरामध्ये सर्वच ठिकाणी मोठ्या प्रमाणात खोदकाम केले जात आहे. यातच योग्य ती खबरदारी न घेतल्याने काही ठिकाणी जलवाहिनी फुटून अनेक वेळा लाखो लिटर पिण्याचे पाणी वाया जाते. तसेच, काही ठिकाणी खोदकाम करताना जलवाहिनी फुटत आहे. त्याची दुरुस्ती न झाल्याने जलवाहिनीतून पाण्याचा पुरवठा केला जात आहे

### पावसाळ्यातही पिण्याच्या पाण्याची वाणवा

» सध्या पावसाळ्याचे दिवस असूनही शहरातील अनेक भागांमध्ये दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. त्यातही काही भागांमध्ये दूषित व गढूळ पाणी पुरवठा झाल्याने जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊन गंभीर धोका होऊ शकतो. याचा सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येमुळे प्रशासनाबद्दल नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# पूररेषेत शेकडो ट्रक राडारोडा; संगमवाडी नदीपात्रातील प्रकार

**प्रशासनाकडून काहीच ठोस कारवाई करण्यात आलेली नाही त्यामुळे आता नदीकाठी केलेले सुशोभीकरणही या राडारोड्याने दिसेनासे झाले आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

मुळा-मुठा संगमावर नदीच्या पूररेषेत शेकडो ट्रक राडारोडा टाकून नदीपात्र बुजविण्याचे काम गेल्या काही महिन्यांपासून बिनदिक्कतपणे सुरू आहे. विशेष म्हणजे, या ठिकाणी नदीकाठ योजना सुधारणाचे काम असताना महापालिकेच्या डोळ्यांदेखत राडारोडा टाकून त्यावर प्रशासनाकडून काहीच ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे आता नदीकाठी केलेले सुशोभीकरणही या राडारोड्याने दिसेनासे झाले आहे.

महापालिकेकडून एकीकडे पर्यावरण दिन जोमात साजरा केला जात असताना मुळा-मुठा नद्या कशा पद्धतीने राडारोडा टाकून गिळंकृत केल्या जात आहेत, याचे धक्कादायक उदाहरण संगमवाडी येथील मुळा-मुठा नदी संगमावर टाकलेल्या शेकडो ट्रक राडारोड्यावरून दिसून येत आहे. या भागात येथील स्थानिक नागरिकांच्या मालकीच्या जागा आहेत.

मात्र, त्या पूररेषेत येत असल्याने त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येत नाही. त्यामुळे या जागामालकांनी या ठिकाणी खासगी ट्रव्हलचे पार्किंग सुरू केले आहे. मात्र, संगमाच्या बाजूच्या जागा खोलगट असल्याने त्या ठिकाणी पार्किंग करता येत नव्हते.

आता मात्र गेल्या काही महिन्यांत या ठिकाणी मोठ्या प्रमाणात राडारोडा टाकून मोकळ्या मैदानासारखे करण्याचे काम सुरू आहे. असे असताना महापालिकेकडून एक-दोनवेळा दंडात्मक कारवाई वगळता कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. राडारोडा टाकून नदीपात्र बुजविण्याचे काम गेल्या काही महिन्यांपासून बिनदिक्कतपणे सुरू आहे. विशेष म्हणजे, या ठिकाणी नदीकाठ योजना सुधारणाचे काम असताना महापालिकेच्या डोळ्यांदेखत राडारोडा टाकून त्यावर प्रशासनाकडून काहीच ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे आता नदीकाठी केलेले सुशोभीकरणही या राडारोड्याने दिसेनासे झाले आहे..



### नदी सुधारणाचे काम की राडारोडा...

» महापालिकेकडून संगम ब्रिज ते बंडगार्डन यादरम्यान नदीकाठ सुधारणा योजनेचे काम सुरू आहे. त्यामुळे संगम ब्रिज येथे टाकण्यात येत असलेला राडारोडा म्हणजे नदी सुधारणाच्या कामाचा भाग असल्याचा गैरसमज होत आहे. त्यामुळे राडारोडा टाकणाऱ्यांचे चांगलेच फावले आहे.

### 'एनजीटी'चे आदेश धाब्यावर

» राष्ट्रीय हरित लवादाने (एनजीटी) ऑक्टोबर 2019 मध्ये दोन्ही महापालिका आणि पीएमआरडी यांना नदीपात्रातील राडारोडा एका महिन्याच्या आत हटविण्याचे आदेश दिले होते. तसेच, ठोस कारवाई न केल्यास 1 कोटीचा दंड आकारण्याची चेतावणी दिली होती. त्यानंतर महापालिकेने संगमवाडीसह, डीपी रस्ता, वारजे येथून शेकडो ट्रक राडारोडा काढला होता. आता पुन्हा या ठिकाणी राडारोडा टाकून एनजीटीचे आदेश धाब्यावर बसविले जात असल्याचे स्पष्ट होत आहे.

**“ संगमवाडी नदीपात्राच्या पूररेषेत शेकडो नव्हे, तर हजारो ट्रक राडारोडा टाकण्यात आला आहे. याला सर्वस्वी महापालिकेचे अधिकारी जबाबदार आहेत. ज्या ठिकाणी राडारोडा टाकला आहे, त्या ठिकाणीच तथाकथित नदीकाठ योजनेचे काम सुरू आहे, असे असताना राडारोडा टाकण्याकडे दुर्लक्ष का करण्यात आले? त्यामुळे संबंधित महापालिका अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी एनजीटीकडे करणार आहोत.**

**- सारंग यादवडकर, ज्येष्ठ पर्यावरणवादी**

**“ संगमवाडी नदीपात्रात राडारोडा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. यापुढे संबंधितांवर थेट गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात येईल.**

**- राजेश भुतकर, कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग**

# संततधार पावसामुळे काढणी योग्य पिकांचं नुकसान

**शेतामध्ये पाणी असल्यामुळे विक्री योग्य कांदा शेतातच नासून गेला तसेच भुईमूगाचे पीक पाण्यामध्ये असल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेंगा कुजून खराब झाले आहेत**

**पुणे | प्रतिनिधी**

भोर तालुक्यातील ग्रामीण भागात ज्या ठिकाणी शेतीसाठी उपयुक्त पाणीपुरवठा उपलब्ध आहे अशा भागामध्ये कांदा,भुईमूग, ज्वारी, बाजरी, गहू ही पिके घेतले जातात. गेले पंधरा दिवस भोर तालुक्यामध्ये अवकाळी पावसाने थैमान घातले आहे.

त्यामुळे शेतकऱ्यांची पिके काढण्यासाठी लगबग सुरू आहे. शेतामध्ये पाणी असल्यामुळे विक्री योग्य कांदा शेतातच नासून गेला आहे. तसेच भुईमूगाचे पीक पाण्यामध्ये असल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेंगा कुजून खराब झाले आहेत, तसेच शेंगाची उगवण झाली आहे. भुईमुगाचा पाला हा जनावरांना पौष्टिक खाद्य मानले जाते परंतु पावसामुळे भुईमुगाचा पाला हा काळा पडल्याने तसेच पाला कुजल्याने जनावरांच्या ओल्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

यंदा पावसाळी पिके सुद्धा अडचणीत आली होती तसेच उन्हाळी पिके चांगले असताना सुद्धा अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाने काढून घेतला आहे. शेतकऱ्यांचे हजारो हेक्टरवरील उन्हाळी पिके काढणीला आली असताना अवकाळी पावसाचे पाणी पिकांमध्ये साचल्याने उन्हाळी पिके पाण्यातून बाहेर काढणे जिकिरीचे झाले आहे, तसेच मजुरांचा तुटवड्यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यासमोर पिकाचं नुकसान होताना पहावयास मिळते आहे. भात हे प्रमुख पीक असून मे महिन्याच्या तिसऱ्या आणि चौथ्या आठवड्यात धुळ वाफेवर भाताची पेरणी केली जाते. या काळात मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस पडल्याने शेतकऱ्यांना पेरणी करता आली नाही.त्यामुळे भाताचे उत्पादनावर परिणाम होणार आहे.



“ यंदा मे महिन्यात चाळीस वर्षात कधी नव्हता एवढा पाऊस पडला. भुईमूग आणि कांदा ही पिके पाण्यात अक्षरशः बुडून गेली दहा दिवस पिकांवर पाणीच होते. पाऊस थोडा कमी झाल्यानंतर भुईमूग आणि कांदा ही पिके काढण्यासाठी सुरुवात केली. गुडघाभर पाण्यातील कांदा सडून गेला आणि भुईमूग काढण्यासाठी मजूर मिळेनात. त्यामुळे बायका मुलांसहित भुईमूग पाण्यातून उपसला भुईमुगाच्या शेंगा काही उगवल्या काही सडून गेल्या

**- रुपेश शिवतरे, प्रयोगशील शेतकरी, उत्रौली (ता.भोर)**

“ दि. ८ मे ते २८ मे या कालावधीमध्ये सरासरीच्या ९०० टक्के पर्जन्यमान झाले आहे.नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी पीक नुकसानीचे पंचनामे करून घ्यावेत. यंदा पावसाळी पिके सुद्धा अडचणीत आली होती तसेच पीक पेरणीसाठी अजूनही शेतामध्ये पुरेसा वापसा नाही त्यामुळे शेतकऱ्यांनी हवामान व पर्जन्यमान याची स्थिती पाहूनच व शेतामध्ये पुरेसा वापसा आल्यानंतरच पिकांची पेरणी करणे आवश्यक आहे.

**- शरद धर्माधिकारी, तालुका कृषी अधिकारी, भोर**